Gramin Krishi Mausam Sewa
Experimental Block Level Agromet Advisory Bulletin
(A Joint Initiative of IMD & ICAR )

# Agromet Advisory Bulletin

**Date : 23-06-2020**

**Weather Forecast of KATOL Block in NAGPUR(Maharashtra) Issued On :2020-06-23(Valid Till 08:30 IST of the next 5 days)**

| Date (y-m-d) | Rainfall (mm) | Tmax (°C) | Tmin (°C) | RH I (%) | RH II (%) | Wind Speed (kmph) | Wind Direction (Degree) | cloud cover (Octa) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2020-06-24 | 7.3 | 28.8 | 23.6 | 77 | 61 | 7.0 | 290 | 8 |
| 2020-06-25 | 0.0 | 34.4 | 25.5 | 69 | 45 | 10.0 | 203 | 6 |
| 2020-06-26 | 4.1 | 37.4 | 27.1 | 66 | 41 | 8.0 | 120 | 8 |
| 2020-06-27 | 0.6 | 36.6 | 27.6 | 65 | 45 | 5.0 | 270 | 8 |
| 2020-06-28 | 17.9 | 35.1 | 24.6 | 80 | 42 | 11.0 | 255 | 8 |

## Weather Summary/Alert:

In Katol block, during next five days from 24/06/2020 to 28/06/2020 weather will be partially cloudy to mostly cloudy, on 24th June, light rain along with thunderstorm accompanied with lightning at scattered places, on 26th and 27th very light to light rainfall at scattered places and on 28th June, 2020 light to moderate rainfall at scattered places is forecasted.

काटोल तालुक्यामध्ये, पुढील पाच दिवस दिनांक २४/०६/२०२० ते २८/०६/२०२० पर्यंत हवामान आंशिक ढगाळ ते मुख्यतः ढगाळ राहील, दिनांक २४ जून रोजी काही ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट आणि हलका पाऊस, दिनांक २६ आणि २७ जून रोजी काही ठिकाणी अति हलका ते हलका पाऊस तसेच दिनांक २८ जून रोजी काही ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

## General Advisory:

Due to sowable rains in the Katol taluka, farmers should sow soybean, tur, urad, mug, cotton, sorghum, maize etc. Farmers are advice for seed treatment of fungicide and bio-fertilizer before sowing.

काटोल तालुक्यात पेरणीयोग्य पाऊस झाला असल्याने शेतकरी बांधवांनी सोयाबीन, तूर, उडीद, मुग, कपाशी, ज्वारी, मका इत्यादि पिकाची पेरणी करावी. शेतकरी बांधवांन्नी पेरणीपुर्वी बुरशीनाशक आणि जीवाणू खताची बीजप्रक्रिया करावी.

## SMS Advisory:

Farmers areadvicefor seed treatmentof fungicide and bio-fertilizer before sowing.

शेतकरी बांधवांन्नी पेरणीपुर्वी बुरशीनाशक आणि जीवाणू खताची बीजप्रक्रिया करावी.

## Crop Specific Advisory:

| Crop(Varieties) | Crop Specific Advisory |
|---|---|
| COTTON | Intercroppping system viz., Cotton + Green gram (1:2) or Cotton + Black gram (1:1) or Cotton + soybean (1:1) or Cotton + Pigeon pea (6:1 or 8-10:2) should be adopted for sustainable production. Post emergence weedicide Pyrithioback Sodium @ 62.5 g a.i. /ha + Quizolfopethyl 50 g a.i. / ha should be sprayed as tank mix at 20-30 DAS (2-4 weed leaf stage).<br>शाश्वत उत्पादनासाठी आंतरपीक पद्धतीमध्ये उदा., कापूस + मुग (१: २) किंवा कापूस + उडीद (१: १) किंवा कापूस + सोयाबीन (१: १) किंवा कापूस + तूर (६:१ किंवा ८-१०:२) अवलंब करा. उगवणीनंतर तणनाशक पायरीथिओबॅक सोडियम @ ६२.५ ग्राम सक्रीय घटक/हेक्टर + क्विझाल्फोपेथिल ५० ग्रॅम सक्रीय घटक मिसळून २०-३० दिवसानंतर तन २-४ पानाच्या अवस्थेत असताना फवारणी करावी. |
| COTTON | Intercroppping system viz., Cotton + Green gram (1:2) or Cotton + Black gram (1:1) or Cotton + soybean (1:1) or Cotton + Pigeon pea (6:1 or 8-10:2) should be adopted for sustainable production. Post emergence weedicide Pyrithioback Sodium @ 62.5 g a.i. /ha + Quizolfopethyl 50 g a.i. / ha should be sprayed as tank mix at 20-30 DAS (2-4 weed leaf stage). |

| Crop(Varieties) | Crop Specific Advisory |
|---|---|
| | शाश्वत उत्पादनासाठी आंतरपीक पद्धतीमध्ये उदा., कापूस + मुग (१: २) किंवा कापूस + उडीद (१: १) किंवा कापूस + सोयाबीन (१: १) किंवा कापूस + तूर (६:१ किंवा ८-१०:२) अवलंब करा. उगवणीनंतर तणनाशक पायरीथिओबॅक सोडियम @ ६२.५ ग्राम सक्रीय घटक/हेक्टर + क्विझाल्फोपेथिल ५० ग्रॅम सक्रीय घटक मिसळून २०-३० दिवसानंतर तन २-४ पानाच्या अवस्थेत असताना फवारणी करावी. |
| SOYABEAN | The spacing between two rows and two plants should be 30 X 8 or 45 X 5 cm and sowing should be done horizontally and east to westdirection.For sowing J.S.-335, J.S.-9305, M.A.U.S. -71, M.A.U.S. -158, M.A.U.S. -162,J.S.-20-29, J.S.-20-34, A.M.S.-1001(PDKV Yellow Gold),AMS-MB-5-18 are recommended variety should be used. |
| | दोन ओळीतील व रोपट्यातील अंतर ३० X ८ किंवा ४५ X ५ सेंमी ठेवावे तसेच उताराला आडवी व पूर्व पश्चिम दिशेला पेरणी करावी. पेरणीकरिता जे.एस. ३३५, जे.एस.९३०५, एम.ए.यू.एस. -७१, एम.ए.यू.एस. -१५८, एम.ए.यू.एस. -१६२, जे.एस.-२०-२९, जे.एस.-२०-३४, ए.एम.एस. – १००१ (पीडिकेव्ही येलो गोल्ड), ए.एम.एस.-एम.बी.-५-१८ या शिफारशीत वाणाचा वापर करावा. |
| RICE | Apply 10 tons of farm yard manure or compost per hectare after field waste collection. Before sowing the seeds of green manure crop in the field, 2 to 3 cultivars should be given and after monsoon rains, 60 kg seed per hectare of Dhaincha or Sunhemp crop should be sown. Adequate improved seed varieties should be made available during kharif season. Salt water treatment: Add 300 gms of salt in 10 liters of water and pour the seeds in it. Once the solution is stable, remove the floating diseased seeds through a sieve and burn. The healthy seeds at the bottom should be washed 2-3 times with clean water and kept in the shade for 24 hours. Before sowing, seeds should be treated with Thirum 3 gm per kg of seed. |
| | शेतातील काडीकचरा वेचनिनंतर शेणखत किंवा कंपोस्ट खत 10 टन प्रती हेक्टर टाकावे. हिरवळीच्या खताच्या पिकाचे बियाणे शेतात फेकण्यापूर्वी २ ते ३ कुळवणी च्या पाळ्या दिल्या पाहिजे तसेच मान्सून च्या पावसानंतर बोरू किंवा ताग पिकाचे प्रती हेक्टरी ६० किलो बियाणे फेकावे. खरीप हंगामामध्ये पुरेश्या प्रमाणात सुधारित धान वाणाचे बियाणे उपलब्ध करून ठेवावे. मिठाच्या पाण्याची प्रक्रिया: १० लिटर पाण्यात ३०० ग्राम मीठ टाकून त्याचे द्रावण बनवून त्यात बियाणे ओतावे, द्रावण स्थिर झाल्यावर तरंगणारे हलके रोगयुक्त बियाणे चाळणीने काढून जाळून टाकावे. तळातील निरोगी बियाणे २-३ वेळा स्वच्छ पाण्याने धुवून सावलीत २४ तास ठेवावे. पेरणीपूर्वी बियाण्यास थायरम ३ ग्राम प्रती किलो बियाणे प्रमाणे बीजप्रक्रिया करावी. |
| MAIZE | Use 15 to 20 kg seed per hectare for sowing of maize crop. Seed treatment should be done by taking Thirum 3 gm per kg of seed. After adequate rainfall, sowing should be done at a distance of 60 cm between two rows and between 15 to 20 cm between two plant (seedlings). |
| | मका पिकाच्या पेरणीकरिता हेक्टरी १५ ते २० किलो बियाणे वापरावे. बियाण्यास थायरम हे बुरशीनाशक ३ ग्राम प्रती किलो बियाणे या प्रमाणात घेऊन बीजप्रक्रिया करावी. पुरेसा पाऊस झाल्यानंतर दोन ओळीतील अंतर ६० सेंमी तर दोन ताटातील (रोपातील) अंतर १५ ते २० सेंमी ठेऊन पेरणी करावी. |
| GREEN GRAM | PKV Moog-8802, PKV Greengold (AKM 9911) varieties of green gram should be select for cultivation of green gram crop, 12-15 kg seed per hectare, spacing between two rows is 30/45 cm and spacing between two plants is 10 cm. Seed treatment, fertilizers as well as bacterial culture should be used before sowing. Apply 20 kg N and 40 kg P per hectare at the time of sowing. |
| | मूग पिकाच्या लागवडीकरिता पिकेव्ही मूग-८८०२, पिकेव्ही ग्रीनगोल्ड (एकेएम ९९११) या वाणाची निवड करावी, प्रती हेक्टरी १२-१५ किलो बियाणे, दोन ओळीतील अंतर ३०/४५ सेंमी आणि दोन झाडामधील अंतर १० सेंमी ठेवावे. पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया, खते तसेच जीवाणू संवर्धनाचा वापर करावा. मुग पिकास पेरणीच्या वेळी २० किलो नत्र आणि ४० किलो स्फुरद प्रती हेक्टरी द्यावे. |
| BLACK GRAM | For cultivation of Black gram crop, TAU-1, TAU-2, PKV udid-15 and PKV black gold varieties should be select, 12-15 kg seed per hectare, spacing between two rows 30/45 cm and spacing between two plants 10 cm. Seed treatment, fertilizers as well as bacterial culture should be used before sowing. Apply 20 kg N and 40 kg P per hectare at the time of sowing. |
| | उडीद पिकाच्या लागवडीकरिता टीएयु-१, टीएयु-२, पिकेव्ही उडीद-१५ आणि पिकेव्ही ब्लॅकगोल्ड या वाणाची निवड करावी, प्रती हेक्टरी १२-१५ किलो बियाणे, दोन ओळीतील अंतर ३०/४५ सेंमी आणि दोन झाडामधील अंतर १० सेंमी ठेवावे. पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया, खते तसेच जीवाणू संवर्धनाचा वापर करावा. उडीद पिकास पेरणीच्या वेळी २० किलो नत्र आणि ४० किलो स्फुरद प्रती हेक्टरी द्यावे. |

| Crop(Varieties) | Crop Specific Advisory |
|---|---|
| PIGEON PEA (RED GRAM/ARHAR) | Rhizobium or Phosphorus Dissolving Fertilizer (PSB) {250 gm per 10 kg of seed) should be used for seed treatment.Recommended varieties of Arhar arePKV-TARA, BSMR-853, BSMR-736 and ICPL-87119(Aasha). Seed treatment, fertilizers as well as bacterial culture should be used before sowing.For sowing, keep 12 to 15 kg seed per hectare and keep 60 cm spacing between two rows and 30 cm spacing between two plants or 90 cm between two rows and 20 cm between two plants. |
| | तूर बियाण्याला बीज प्रक्रियेसाठी रायझोबियम किंवा स्फुरद विरघळविणारे खते (पीएसबी) {२५० ग्राम प्रती १० किलो बियाणे} यांचा वापर करावा. तूर पिकाचे शिफारस केलेले वाण-एकेटी-८८११, पीकेव्ही-तारा, बीएसएमआर-८५३, बीएसएमआर-७३६ आणि आयसीपीएल-८७११९ (आशा).पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया, खते तसेच जीवाणू संवर्धनाचा वापर करावा. पेरणीकरिता प्रती हेक्टरी १२ ते १५ किलो तसेच दोन ओळीतील अंतर ६० व दोन झाडामधील अंतर ३० सेंमी किंवा दोन ओळीतील ९० सेंमी व दोन झाडामधील २० सेंमी ठेवावे. |
| CITRUS | During this month there is rapid spread of citrus canker hence the affected leaves, branches should be pruned and burnt. Spray copper oxychloride 180 gm with streptocycline 6 gm in 60 litres of water. Repeat the spray 3-4 times at an interval of 30 days. To check fruit drop of Ambia bahar spray the santra trees with 1.5 gms 2, 4-D or gibberelic acid (GA). 100 gms carbendazim 50 wp with 1 kg urea in 100 litres of water. Repeat the spray after 15 days if the fruit drop continues. |
| | या महिन्यात लिंबूवर्गीय खैऱ्या रोगाच्या झपाट्याने प्रसार होतो त्यामुळे प्रादुर्भावग्रस्त पाने, फांद्या छाटून शेताबाहेर जाळून टाकाव्या. कॉपर ऑक्सीक्लोराईड 180 ग्रॅम स्ट्रेप्टोसायक्लिन 6 ग्रॅम 60 लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.. 30 दिवसांच्या अंतराने पुन्हा ३ ते ४ वेळा फवारणी करावी. आंबिया बहारच्या फळ गळ रोखण्यासाठी संत्राच्या झाडाला १.५ ते २ ग्रॅम २-४ डी किंवा गिब्रेरेलिक ॲसिड(जीए)ची संत्राच्या झाडाला फवारणी करावी. १०० लिटर पाण्यात १ किलो युरियासह 100 ग्रॅम कार्बेन्डाझिम ५० % डब्लू. पी. ची फवारणी करावी तसेच फळ गळ कायम राहिल्यास पुन्हा 15 दिवसांनी दुसरी फवारणी करावी. |

**Livestock Specific Advisory:**

| Livestock(Varieties) | Livestock Specific Advisory |
|---|---|
| BUFFALO | Offer clean and cold water (stored in earthen pot) to the animals.Deworming of livestock should be done by seeking advise of Veterinary practitioner.One week after Deworming, vaccinate the cattle and buffaloes against Foot, & mouth disease (FMD), Black quarter (BQ) and Haemorrhagic Septicemia (HS).Keep the livestock under the shed to protect from heat. |
| | जनावरांना स्वच्छ आणि थंड पाण्याची सोय करावी.पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याच्या मदतीने जनावरांना जंत नाशकाची मात्रा/लस द्यावी.जंतनाशाकाची मात्रा/लस दिल्यावर एक आठवड्यानंतर गायी आणि म्हशींना तोंडखुरी/पायखुरी, एकटांग्या, घटसर्प टाळण्याकरिता पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याने लसीकरण करावे. |
| GOAT | Vaccinate thegoat against FMD, HS, PPR and enterotoxaemia. Offer clean and cold water (stored in earthen pot) to the animals. Keep the livestock under the shed to protect from heat. |
| | शेळ्यांना पायखुरी/तोंडखुरी, घटसर्प आणि आंत्रविषार टाळण्याकरिता पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याने लसीकरण करावे. जनावरांना स्वच्छ आणि थंड पाण्याची सोय करावी. जनावरांचे उष्णतेपासून संरक्षण करण्यासाठी जनावरांना शेड किंवा गोठ्यात ठेवावे. |

**Others(Soil Testing/Conservation /Land Preparation Specific Advisory:**

| Others(Soil Testing/Conservation /Land Preparation(Varieties) | Others(Soil Testing/Conservation /Land Preparation Specific Advisory |
|---|---|
| GENERAL ADVICE | At the time of purchasing seed, farmers are advised to check the detail on tag/label such as, name of crop, crop kind, variety, physical and genetic purity percentage, germination and inert matter percentage, net weight, lot and batch number, date of testing and packing, maximum retail price, moisture percentage etc. Take the original bill from the seller and ensure that the signature on bill of both seller and seed purchasing farmers. |
| | |

| Others(Soil Testing/Conservation /Land Preparation(Varieties) | Others(Soil Testing/Conservation /Land Preparation Specific Advisory |
|---|---|
| | शेतकरी बांधवांनी बियाणे खरेदी करताना टॅग/लेबल वरील संपूर्ण माहिती जसे कि, पिकाचे नाव, वाण/जात, उगवणशक्ती, भौतिक व अनुवांशिक शुद्धता टक्केवारी, निव्वळ वजन, बियाणे चाचणी, तारीख, महिना व वर्ष, बीज प्रक्रियेला वापरलेले रसायन, तसेच विक्रेत्याचे नाव व पत्ता इत्यादि माहिती तपासून घ्यावी. बियाणे विक्रेत्याकडून खरेदी केलेल्या बियाण्याची पक्की पावती/बिल घ्यावे, त्यावर विक्रेता आणि खरेदी करणारे शेतकरी यांची स्वाक्षरी असल्याची खात्री करावी. |
| PLANT PROTECTION | Farmers should take necessary precautionary measures while spraying insecticide, fungicide etc. |
| | शेतकरी बांधवांनी कीटकनाशके, बुरशीनाशके इत्यादींची फवारणी करताना स्वतःची योग्य ती काळजी/खबरदारी घ्यावी. |
| PLANT PROTECTION | Farmers should take necessary precautionary measures while spraying insecticide, fungicide etc. |
| | शेतकरी बांधवांनी कीटकनाशके, बुरशीनाशके इत्यादींची फवारणी करताना स्वतःची योग्य ती काळजी/खबरदारी घ्यावी. |
| GENERAL ADVICE | To get the agro-meteorological advisory service bulletins issued by District Agro-Meteorological Unit, Krishi Vigyan Kendra, Central Cotton Research Institute, Nagpur, Under the Gramin Krushi Mausam Seva Project on every Tuesday and Friday through WhatsApp, farmer's should send their full name, village name, taluka, district name and crop they have taken in farm on 9552703020. |
| | ग्रामीण कृषी सेवा प्रकल्पाअंतर्गत, जिल्हा कृषी हवामान केंद्र, कृषी विज्ञान केंद्र, केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपुर द्वारे दर मंगळवारी आणि शुक्रवारी प्रसारित होणारे कृषी हवामान सल्ला पत्रक व्हाट्स ऍप द्वारे मिळविण्याकरिता ९५५२७०३०२० या व्हाट्स ऍप क्रमांकावर शेतकऱ्याचे संपूर्ण नाव, गावाचे नाव, तालुका, जिल्हा तसेच घेत असलेले पिके इत्यादी माहिती पाठवावी. |